# * ती वेळ *

कुणासाठी थांबत नाही ती वेळ...
कुणाचं जीवन घडवते तर कुणाचं जीवन पलटवते
ती वेळ...
एकदा गेली की परतत नाही ती वेळ...
मुठीतील रेतीप्रमाणे झरझर सरते ती वेळ...
पश्चातापाच्या अग्नीत झुरवते ती वेळ...
भावभावनांच्या हिंदोळ्यावर झुलवते ती वेळ...
चुकलेल्याला दुसरी संधी देते ती वेळ...
चुकांची जाणिव करून देते ती वेळ...
परिस्थिती बदलवते ती वेळ...
घड्याळ्याच्या काट्याप्रमाणे नशीबाचे चक्र फिरवते ती वेळ...
क्रूर नियतीलाही आपल्या पुढे हात टेकायला लावते ती वेळ...
मनाच्या आणि शरीरांच्या जखमांवर औषध असते ती वेळ...
राजाला रंक आणि रंकाला राजा बनवते ती वेळ...
भल्याभल्यांचे गर्वहरण करते ती वेळ...
हसता हसता रडवते अन् रडता रडता हसवते ती वेळ...
जीवन जगण्याचे मर्म शिकवते ती वेळ...



– सौ. माधवी पंकज हांडे
ठाकुर्ली, ठाणे.